महसूल व वन विभाग
**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, जळगाव**
**(गृह शाखा)**
आकाशवाणी केंद्राजवळ, जळगांव, ता.जि.जळगाव - 425 001
**दुरध्वनी क्रमांक** - 0257- 2220152 **ई मेल** - homebranchjalgaon@gmail.com

क्र दंडप्र-01/कावि/2020/277 दिनांक 6 जून, 2020

**विषय :- कोव्हिड-19 पॉझिटीव्ह व High risk Suspect contacts व्यक्तींना Quarantine करण्याबाबत मार्गदर्शक सुचना......**

**परिपत्रक :-**

जळगांव जिल्हयात करोना विषाणूचा (कोव्हिड-19) वाढता प्रादुर्भाव व कोव्हिड-19 पॉझिटीव्ह रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता, जिल्हा प्रशासनामार्फत अनेक प्रभावी प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविल्या जात आहेत. सदर प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा भाग म्हणून वेळोवेळी शासनामार्फत तसेच जिल्हा प्रशासनामार्फत मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सदर मार्गदर्शक सुचनांद्वारे Covid Care Centres च्या ठिकाणी घ्यावयाची दक्षता, कोव्हिड-19 पॉझिटीव्ह व High risk suspect contacts व्यक्तींना Quarantine करण्याबाबत सर्व संबंधितांना वेळोवेळी सूचीत करण्यात आलेले आहे.

तथापि जळगांव जिल्हयातील Covid Care Centres, Institutional Quarantine सुविधा असणा-या ठिकाणी भेटी दिल्या असता अशी बाब निदर्शनास आलेली आहे की, क्षेत्रीय स्तरावर काही अधिकारी / वैद्यकीय अधिकारी यांचेकडून शासनामार्फत निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन केले जात नसून संबंधित अधिकारी / वैद्यकीय अधिकारी त्यांचे स्तरावरच कोव्हिड-19 पॉझिटीव्ह व High risk suspect contacts व्यक्तींना Home Quarantine करण्याबाबत निर्णय घेत आहेत.

सदरची बाब लक्षात घेता, जळगांव जिल्हयातील क्षेत्रीय स्तरावरील सर्व अधिकारी , वैद्यकीय अधिकारी , कर्मचारी यांना खालील प्रमाणे सक्त सूचना देण्यात येत आहेत.

1) जळगांव जिल्हयामध्ये आढळून येणा-या कोव्हिड-19 पॉझिटीव्ह व्यक्तींना कोणत्याही परिस्थितीमध्ये Home Quarantine करण्यात येऊ नये. कोव्हिड-19 पॉझिटीव्ह व्यक्तींना जर Home Quarantine करण्यात आले तर सदर व्यक्ती त्याच्या कुटूंबातील अन्य व्यक्तींच्या संपर्कात येऊन कोव्हिड-19 विषाणूचा प्रादुर्भाव , संसर्गाचा मोठया प्रमाणात फैलाव होण्याची शक्यता नाकारता येत नाही, त्यामुळे संबंधित कोव्हिड-19 पॉझिटीव्ह व्यक्तींना Home Quarantine न करता त्यांना लगतच्या Covid Care Centres मध्ये दाखल करण्यात यावे.

2) तथापि, कोणत्याही कोव्हिड-19 पॉझिटीव्ह व्यक्तींना त्यांचेकडील स्वतंत्र व्यवस्था व स्थानिक परिस्थिती विचारात घेऊन आवश्यकता भासल्यास Home Quarantine करावयाचे असल्यास संबंधित व्यक्तीने / त्याच्या नातेवाईकांनी जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडेस लेखी स्वरुपात परवानगीसाठी अर्ज करावा. सदर व्यक्तीला Home Quarantine करण्याच्या आवश्यकतेची जिल्हा प्रशासनाकडून पडताळणी करुनच त्याला Home Quarantine करण्याबाबतचा निर्णय घेण्यात येईल, मात्र जळगांव जिल्हयामध्ये जिल्हाधिकारी जळगांव वगळता अन्य कोणासही अशी परवानगी देण्याचा अधिकार असणार नाही, याची सर्व संबंधित अधिकारी / वैद्यकीय अधिकारी /कर्मचारी / यंत्रणा यांनी गांभियाने नोंद घ्यावी.

Scanned with CamScanner

3) जळगांव जिल्हयामध्ये कोव्हिड-19 पॉझिटीव्ह व्यक्तींच्या संपर्कातील High risk suspect contacts व्यक्तींना सर्व संबंधित अधिकारी / वैद्यकीय अधिकारी /कर्मचारी / यंत्रणा यांनी Institutional Quarantine करणे बंधनकारक राहील. कोव्हिड-19 विषाणूचा प्रादुर्भाव आणखी फैलाव होऊ नये याकरीता कोणत्याही परिस्थितीत सदर High risk suspect contacts व्यक्तींना Home Quarantine करण्यात येऊ नये. आवश्यकतेप्रमाणे याबाबतच्या व्यवस्थेत वाढ व उत्तम सुविधा स्थानिक पातळीवर निर्माण करण्यात यावी.

वरील सुचनांचे पालन न केल्यास सर्व संबंधितांवर आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 व भारतीय दंड संहिता, 1860 चे कलम 188 नुसार कारवाई करण्यात येईल, याची गांभिर्याने नोंद घ्यावी.

(डॉ. अविनाश ढाकणे)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगांव**

**प्रत :- माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जळगांव
2. पोलीस अधिक्षक जळगांव
3. आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका जळगांव
4. उपविभागीय दंडाधिकारी सर्व
5. जिल्हा शल्य चिकीत्सक, जळगांव
6. कार्यकारी दंडाधिकारी सर्व
7. मुख्याधिकारी, नगरपालिका / नगरपरिषद सर्व
8. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि प जळगांव

**प्रत :- अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव** यांनी सदरील परिपत्रकाबाबत सर्व संबंधित वैद्यकीय अधिकारी यांना अवगत करावे.

**प्रत :- जिल्हा शल्य चिकीत्सक, जळगांव** यांनी सदरील परिपत्रकाबाबत त्यांचे अधिनस्त सर्व संबंधित वैद्यकीय अधिकारी / कर्मचारी यांना अवगत करावे.

**प्रत :- जिल्हा माहिती अधिकारी जळगांव** यांनी सदर परिपत्रकास स्थानिक वर्तमानपत्रातून विनामुल्य प्रसिध्दी द्यावी.

**प्रत :- जिल्हा विज्ञान व सुचना अधिकारी जळगांव** यांनी सदरील परिपत्रकाचे jalgaon.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यबाबतची कार्यवाही करावी.

Scanned with CamScanner